भगवान अंजनीकर यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड .

कला शाखेअंतर्गत मराठी विषयाच्या पीएच.डी. साठी सादर करण्याची

सारांश पत्रिका

संशोधक

नामपल्ले शिवाजी हुल्लाजी

मार्गदर्शक

प्रा.डॉ. सौ. मथु सांवत

पदव्युत्तर संशोधन केंद्र, मराठी विभाग

पीपल्स कॉलेज, नांदेड

२०१५-२०१६

प्रस्तावना :

१९६० नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे वाड्.मयीन प्रवाह निर्माण झाले. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, जनवादी इ. साहित्य प्रवाह निर्माण होऊन साहित्य समृध्द होऊ लागले साठोत्तरी वाड्.ययीन प्रवाह व देशीय विचारामुळे नवोदित लेखकांना प्रेरणा मिळू लागली.

१९७० ते १९८० हा काळ मराठवाड्यासाठी परिवर्तनाचे दशक म्हणून ओळखला जातो. याच काळात मराठवाडा विकासासाठी आंदोलने झाले. या आंदोलाचे नेतृत्व गोविंदभाई श्रॉफ यांनी केले. लेखन स्वातंत्र्याला या काळात भर येऊ लागली. मराठवाड्याची अस्मिता जागृत होऊ लागली. तरुण तरुणी मोठ्या प्रमाणात महाविद्यालयीन शिक्षण घेवू लागले. प्राचार्य नरहर कुरुंदकर, प्राचार्य ना.य.डोळे, ताराबाई परांजपे, डॉ. जनार्दन वाघमारे, गंगाधर पानतावणे इ. लेखक मार्गदर्शन करु लागले. याच काळात दत्ता भगत,लक्ष्मीकांत तांबोळी,फ.मु. शिंदे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, रविंचंद्र हडसनकर, डॉ.जगदीश कदम, डॉ.प्रल्हाद लुलेकर असे कित्येक लेखक नव्याने साहित्य लिहु लागले. मराठवाडा साहित्य महोत्सव होऊ लागले. त्यात तरुण लेखक उत्साहाने भाग घेऊ लागले. या काळात म्हणजे १९८० साली भगवान अंजीनकराची पहिली कादंबरी 'अस्वस्थ किनारा' निर्मल प्रकाशनाने प्रकाशित केली.

संत तुकारामांच्या 'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे यत्न करु' या उक्ती प्रमाणे भगवान अंजनीकर यांनी विद्यार्थी दशेतच शब्दांची संगत केली, 'शब्दशिल्प' हे मासिक त्यांनी विद्यार्थी देशत सुरु केले. भगवान अंजनीकरानी वाड्.मयक्षेत्रात विपूल प्रमाणात लेखन निर्मिती केली. त्यांची १०५,पुस्तके महाराष्ट्रातील विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली. कांदबरी, नाटक, एकांकिका, बालकविता, संस्कारक्षम चरित्र, संपादन इ वाड्.मय प्रकार त्यांनी हाताळले विविध साहित्य प्रकारात अनेक वाड्.मयीन अंगाने युक्त लेखन करणारे भगवान अंजनीकर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहेत. अशा या स्वानंदी लेखकाच्या साहित्याचा विवेचक अभ्यास प्रस्तुत संशोधन प्रबंधात करावयाचा आहे.

मराठवाड्यातील मराठी साहित्याचा वटवृक्षात रुपांतर करणारे भगवान अंजनीकर हे लेखक आहेत, असे म्हणाले तर वावगे ठरणार नाही. कारण भगवान अंजनीकर यानी विविध वाड्.मय प्रकारात लेखन केलेल दिसून येते. त्यामध्ये, कांदबरी,कथासंग्रह, चरित्र, संपादने, ललित,स्फुटलेखन, इ. वाड्.मय प्रकाराचा प्रामुख्याने उल्लेख होतो. मराठी साहित्यात वर उल्लेख केलेल्या वाड्.मयप्रकारानुसार लेखन करणारे भगवान अंजनीकर हे एखादे दुसरे व्यक्तिमत्त्व असू शकते. अंजनीकरांनी लिहिलेल्या वाड्.मयीन प्रकारानुसार कलाकृतीचा अभ्यास होणे व त्यापाठीमागे त्यांची साहित्य भूमिका समजून घेणे हे महत्त्वाचे ठरणार आहे. म्हणून प्रस्तुत प्रंबधलेखनाचा विषय 'भगवान अंजनीकर यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास' असा निवडला आहे.

भगवान अंजनीकर यांच्या लेखनाचा गौरव मराठी वाड्.मयातील सन्माननीय वाड्.मयीन संस्थांनी केलेला आहे. यात विशेष करुन महाराष्ट्र शासनाचा उल्लेख करावा लागेल. उमरी येथील यशंवत कनिष्ठ महाविद्यालयात ३२ वर्ष सेवा करुन अंजनीकरानी आकशवाणी केंद्र नांदेड व्दारे 'विचार पुष्प' सदरातून अनेक विचार लेखाचे प्रसारण करु लागले.

कांदबरी हा भगवान अंजनीकर यांचा आवडता वाड्.मय प्रकार आहे. कांदबरीचा आंनद हा जसा लेखकाचा आहे. तसा वाचकाचा ही आहे. कारण कांदबरातील कथानक फुलवताना अनेक, पात्रांची व्यक्तिमत्वे शब्दातून प्रकट होतात. प्रेयसीसाठी सर्वस्वाचा त्याग करणारा प्रियकर अखेर मृत्युला कवटाळतो आणि त्याच्या मृत्युनंतर प्रेमानुभूतीने वेडी झालेली प्रेयसीची अवस्था 'कैलासवासी प्रियकर' या कादंबरीतून आलेल चित्रण अत्यंत भावस्पर्शी अंजनीकर असे मांडतात अशा अनेक कांदबऱ्याचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रंबधात करण्याचा प्रयत्न आहे.

बालसाहित्यिक हा मुलामध्ये रमणारा असावा अशी जानकाराची अपेक्षा असते. याचे कारण म्हणजे बालकासाठी लिहिलेले साहित्य हे मुलाना कळले पाहिजे त्यातील गोष्टीचे आकलन झाले पाहिजे. त्यातल्या भावनाशी समरस होता आले पाहिजे, तेच खरे बालसाहित्य होय. भगवान अंजनीकर याचे बालसाहित्य बालकांना आंकलनक्षम आहे. त्यांनी बालसाहित्यातले विविध वाड्.मयप्रकार हाताळले आहेत. 'मदतीचा हात' 'मनी माजर आणि काळा बोका' या बाल कथा आहेत. 'बाहुलीचा वाढदिवस'घंटा वाजली' अशा अनेक बालसाहित्याचा विवेचक अभ्यास करण्याचा शोध प्रबंधात करावयाचा आहे.

भगवान अंजनीकर यांचा 'निमित्त' हा लेख प्रसिध्द आहे.शिक्षण हा त्यांच्या ललित लेखनाचा मुख्य विषय आहे.शिक्षण क्षेत्रातील मोडकळीस आलेल्या शिक्षण व्यवस्थेवर या निमित्ताने प्रहार घातले आहेत. 'ज्ञानवंताची शोकांतिका' 'सुत्रधाराची मतलबी खेळी' इ. अनेक लेख प्रसिध्द आहेत. 'अंधार हटवणारा प्रकाश' वाळवंटातील ओयॉसिस, या सारख्या ललित लेखातून परिस्थितीवर मात करुन झेपावण्याचा संदेश देण्याचा प्रयत्न भगवान अंजनीकर केले आहेत.

भगवान अंजनीकर यांनी अनेक विविध वाड्.मय प्रकार लिलया हाताळलेले दिसतात. वेगवेगळे विषय आणि नाविन्यपूर्ण आशयांनी संपन्न त्याचे लेखन आहे. त्यांच्या लेखनाची भाषा अतिशय साधी, सोपी, खिळवून ठेवणारी आहे. चित्रपटाला शोभेल असे ओघवते कथानक त्यांच्या पात्राच्या भाषेची वैशिष्टये आहेत. हजरजबावी संवाद हे त्यांच्या पात्रांच्या संवादाची वैशिष्टये आहेत. अशा या अनेक भाषा वैशिष्टयांचा अभ्यास विवेचक पध्दतीने करावयाचा आहे.

साहित्याच्या वाड्.मयीन प्रकारानुसार अंजनीकराच्या कलाकृतीचा अभ्यास होणे व त्यापाठीमागे त्यांची साहित्य भूमिका समजून घेणे हे या प्रबंधलेखानाचा मुख्य उद्देश आहे. म्हणूनच प्रस्तुत शोधप्रबंधलेखनाचा विषय 'भगवान अंजनीकर यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास' असा निवडला आहे.

गृहितके :

- भगवान अंजनीकर हे मराठवाड्यातील मराठी साहित्यात महत्त्वाची भर घालणारे साहित्यकार आहेत.
- भगवान अंजनीकर यांच्या साहित्यातून संवेदनशीलतेचा उत्कृष्ट अविष्कार दिसून येतो.
- सामान्य माणसांच्या जीवनजाणिवा प्रकट करणे हा अंजनीकरांच्या साहित्याचा मुख्य विषय आहे.
- आशय नाविण्य आणि वैशिष्टयपूर्ण अविष्कारशैली हे भगवान अंजनीकर यांच्या साहित्याचे महत्त्वाचे विशेष आहेत.

संशोधनाची उद्दिष्टये :

- अंजनीकर यांच्या साहित्याच्या प्रेरणांचा (सामाजिक चळवळी, वाड्.मयीन पर्यावरण, सांस्कृतिक घडामोडी इ.) शोध घेणे.
- भगवान अंजनीकर यांची वाड्.मय प्रकाराविषयीची भूमिका समजून घेणे.
- भगवान अंजनीकर यांच्या भाषाशैली व लेखन वैशिष्टयाचा अभ्यास करणे.
- अंजनीकर यांच्या लेखणीच्या बलस्थानाचा शोध घेणे.
- अंजनीकर यांच्या साहित्याचे आशय अभिव्यक्तीच्या, भाषाशैली या अंगाने मूल्यमापन करणे.

प्रबंध विषयाचे महत्व :

प्रस्तुत शोधप्रबंधाचा भगवान अंजनीकर यांच्या साहित्याचे आकलन होण्यासाठी वाचक, संशोधक, अभ्यासकाला फायदा होईल. समाज जीवनातील वर्तमान समाजवास्तव आणि साहित्य, सांप्रतकाळ आणि मानवी भावना यातील अनुबंध उलगडण्यास मदत होईल. मुल्य हरवत जाणाऱ्या उदयोन्मुख पिढींवर संस्कार करुन त्यांच्यात मूल्यभान आणणे हा त्यांच्या साहित्याचा हेतू आहे. समाजवास्तव आणि जीवनाचे बदलते संदर्भ साहित्याच्या चिमटीत कसे पकडायचे आणि अधिक प्रभावीपणे कसे मांडता येईल यांचे दिग्दर्शन नव्या वाचकांना, लेखकांना, ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांना समाजातील वेगवेगळया घटना प्रसंगाना सामोरे जाण्यासाठी या संशोधन कार्याचा फायदा होईल.

विषय निवडी संबंधी भूमिका :

१९६० नंतरच्या महत्त्वाच्या लेखकात भगवान अंजनीकर यांचे नाव घेतले जाते. कथा, कादंबरी, बालकविता, चरित्र, स्फुटलेखन, इत्यादी अनेक वाड्.मय प्रकारात लेखन करुन वाचकाला साहित्याविषयी रस निर्माण करण्याचे, मुल्यभान जागवण्याचे कार्य अंजनीकरानी केलेले आहे.

भगवान अंजनीकराचे लेखन लोकप्रियतेसोबतच कसदारही आहे. अंजनीकर यांच्या लेखनाला लोकमान्यतेबरोबरच राजमान्यताही मिळाली आहे. त्यांच्या साहित्यात जीवनानुभूतीतून साकार झ - ालेले पात्र , प्रसंग, विनोद, याचे प्रत्ययकारी दर्शन दिसते. तरुण आणि तरुणीच्या मनाची अवस्था ते प्रत्ययकारी पध्दतीने मांडतात. त्यामुळेच भगवान अंजनीकराच्या साहित्याचा अभ्यास करणे मला आवश्यक वाटते.

संशोधनाची अभ्यास पध्दती :

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी खालील संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

- अंजनीकर यांच्या लेखनाची सूची वाड्.मय प्रकारानुसार तयार करणे.
- ग्रंथालयीन ग्रंथाचा वापर करणे.
- वर्णनात्मक संशोधन पध्दती.
- चरित्रात्मक संशोधन पध्दती.
- विश्लेषणात्मक संशोधन पध्दती.
- आस्वादात्मक संशोधन पध्दती.
- संशोधन विषयाच्या आवश्यकतेनुसार / (अभ्यासाच्या दृष्टीने / मुलाखत तंत्राचा वापर / उपयोग करणे.

प्रबंध विषयाचे स्वरुप व मर्यादा :

संशोधक हा संशोधन कार्य पूर्ण करीत असताना, संशोधकाला व्यासंग आणि आपली आवड लक्षात घेवून संशोधनाचा विषय निवडावा लागतो. संशोधनाच्या अवघड अशा कार्यात सुलभता नेमकेपणा आणि अचुकता येण्यासाठी संशोधन विषयाच्या कक्षा निश्चित कराव्या लागतात.

प्रस्तुत संशोधकाने 'भगवान अंजनीकर यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास' करताना २०१६ पर्यंतचे साहित्याचे संशोधन अपेक्षित आहे. याच काल मर्यादेच्या कक्षेत राहुन कलाकृतीतून येणारे अनुभव विश्व, घटनाप्रसंग, पात्रचित्रण, भाषा वैशिष्टये इ. वाड्:मयीन कलत्मकतेचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण पहिले

भगवान अंजनीकर यांचे वाङ्.मयीन व्यक्तीमत्त्व

भगवान अंजनीकर यांनी विपुल प्रमाणात वाङ्.मय लेखन केले आहे. मराठवाड्यातील साठोत्तरी वाङ्.मयीन प्रवाहातील एक महत्त्वाचे लेखक म्हणून त्यांची ओळख आहे. भगवान अंजनीकर यांची बालपणापासून ते मराठीतील एक सिध्दहस्त लेखक म्हणून झालेली जडण-घडण, त्यांचे व्यक्तिमत्व शिक्षण, वेगवेगळ्या साहित्य उपक्रमात त्यांनी दिलेले योगदान,त्यांची लेखनविषयक भूमिका, मानवी जीवनाबद्दलचा दृष्टीकोन, वाङ्.मय सेवेबद्दल त्यांना मिळालेले पुरस्कार सन्मान इ. अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

भगवान अंजनीकर यांच्या कादंबऱ्या

भगवान अंजनीकराच्या कादंबऱ्या ह्या प्रामुख्याने सामाजिक प्रश्न हाताळताना दिसतात. जीवनात किती संकटे आले तरी त्याचा प्रतिकार कसा करायचा व वास्तव समाजजीवनामध्ये जे जे काही घडते ते अंजनीकरानी कलाकृतीमधुन मांडण्याचा प्रर्यत्न त्यांनी केले आहे. ‘गजरा’, ‘एकटी’, ‘कैलासवाशी प्रियकर’ इत्यादी कादंबऱ्यातून दिसुन येते. अशा सर्व कांदबऱ्याचा विवेचक अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

भगवान अंजनीकर यांच्या कथा

भगवान अंजनीकर यांच्या कथालेखनाचा मुख्य विषय ग्रामसंस्कृती असा आहे. ग्रामजीवनातील चढ-उतार,ग्रामीण माणसाचे भावविश्व, त्यांच्या जीवनधारणा याविषयांचे चित्रण त्यांच्या कथांत आले आहे. परिस्थितीशरणतेमुळे ग्रामीण जीवनात आलेली विफलता त्यांच्या कथामधून दिसून येते. त्यांच्या मोजक्याच पण वाङ्.मयीन व सामाजिकदृष्टया सकस व दर्जेदार कथांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

अंजनीकराच्या अनेक कथातुन प्रेम जाणीव येते. ‘प्रेमभंग, प्रेमातील अपेक्षा भंग, प्रेमापुर्वीच प्रेम, संपने, बालपणातील प्रेम, अव्यक्त प्रेम’ अशी विविध प्रेमरुपे, त्यांच्यां कथा साहित्यातून दिसतात. अशा अनेक कथांचा विवेचक अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे

भगवान अंजनीकर यांचे बालसाहित्य

बालसाहित्याचे प्रयोजन प्रौढ असो किंवा बालवाड्.मय असो संस्कार करणे आणि सुसंस्कृत करणे हेच आहे. प्रौढ हा मुलाच्या मनांच्या पोषणासाठी नव्या अनुभूतीची गरज असते. वाड्.मयाद्वारे त्याच्या मनाचे पोषण होते आणि माणूस सुसंस्कृत बनतो. बालसाहित्यात उपदेश मार्गदर्शन बोध या वाड्.मय बाह्य प्रेरणा असूनही बालसाहित्य हे उद्दिष्टानुसार असले तर ते प्रौढ गाथा बनते असा मानणारा एक वर्ग आहे.

बालसाहित्यात दुधातील साखरे प्रमाणे मनोरंजनात बोध एकत्रीत झाला पाहिजे. तेव्हाच मनोरंजन आणि उद्‌बोधन या दोन्हीपासून मिळणारे आनंद बालकाच्या मनाचे उन्नयन करेल हे ही तेवढेच खरे. भगवान अंजनीकरांची मराठवाड्यातील जेष्ठ लेखक व बालसाहित्यिक म्हणून ओळख सर्वदूर आहे. त्यांनी बालसाहित्यातील कथा, कांदबरी, चरित्र, बालकविता असे सर्वच प्रकट खुबीने हाताळले आहेत. 'जगा वेगळा राम', 'जंगलचा राजा', 'परिवर्तनाची लढाई', 'समजुतदार विणू' इत्यादी बालसाहित्याचा विवेचक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

भगवान अंजनीकर यांचे ललितलेखन व स्फुटलेखन

भगवान अंजनीकर यांच्या एकूण लेखनाची प्रेरणा , बुडती हे जन न देखवे डोळा अशी आहे. किंबहूना ज्ञानदिप जगी लावून जग उजळून काढावे अशी आहे. त्यांनी आयुष्यभर निष्ठेने काम केले युवक सर्वअर्थाने सुधारले पाहिजे अशी अंतरीक तळमळ ही त्यांच्याकडे आहे. 'तुमचे भवितव्य तुमच्या हाती' या छोट्या खानी पुस्तकातून वेगळ्या जीवनदृष्टीचा प्रत्यय येतो.

युवक योग्य मार्गावर चालत राहिला तर समाज सुस्थितीत मध्ये राहतो व पुढे जातो. म्हणूनच लोकहितवादी पासुन समाजाशी , युवकांशी, संवाद सुरु आहे. महात्मा फुले, गो.ग.आगरकरांनी समाजाशी व युवकाशी संवाद साधला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या समाजातील युवकांचे प्रश्न वेगळे आहेत. बेकारी युवकांची दिशाभूल करण्याचे प्रयत्न सध्या सुरु आहेत. आचार्य दादा धर्माधिकारी, बाबा आमटे, यदुनाथ थत्ते, अशी फार मोठी मंडळी तरुणासाठी लिहिताना दिसतात. परंतू भगवान अंजनीकर आपले नाते पारंपारिक विचाराशी सांगत नाहीत तर महात्मा फुले आगरकर परंपरेशी सांगतात. जिद्द, अथक परिश्रम करण्याची वृत्ती, मनाची एकाग्रता, अशा मूल्यावर भर देतात.

त्याच्या कवितेचे ‘दिपस्तंभ, ‘संस्कारपीठाचे कुलगुरु’, ‘निवडक महापुरुष’, ‘स्मरण आणि चिंतन’ इत्यादी चरित्रलेखातुन महापुरुषाचे विचार मांडतांना दिसतात. ‘तुमचे भविष्य तुमच्याच हाती , विचार रंग’ इत्यादी ललित लेखाचा व चरित्र लेखाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

भगवानर अंजनीकर२ यांच्या लेखनाची भाषाशैली व वैशिष्टये

भाषा ही मानवी जीवनात अतिशय महत्त्वाचे कार्य करते. भाषेशिवाय माणूस जगू शकत नाही. मानवी मनातील भाव भावना, मानवा मानवातील अंतरक्रिया विचारांची देवाण घेवाण करण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. लेखकाच्या मनात असलेले विचार साहित्य रुपाने वाचकासमोर साकारले जाते. म्हणून लेखक व वाचक यामध्ये संदेश वहनाचे कार्य या भाषाशैलीमुळे घडते. अंजनीकराची भाषा सहज, साधी, सोपी, आकलनक्षम आहे. त्यांची भाषा तरुणांच्या मनाचा ठाव घेते. त्यामुळे तरुण भगवान अंजनीकराच्या साहित्याकडे आकर्षला गेला आहे. ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शन चित्रण त्याच्या भाषेतून चित्रित होताना दिसून येते. ओघवते कथानक, हजरजबाबी संवाद हे त्यांच्या पात्राच्या भाषेची वैशिष्टये दिसून येतात. अशा या अनेक भाषा वैशिष्टयांचा प्रस्तुत प्रकरणात अभ्यास करण्यात येणर आहे.

प्रकरण - सातवे

निष्कर्ष व समारोप

वरील सहा प्रकरणाच्या अभ्यासातुन हाती आलेले वस्तुनिष्ठ निष्कर्ष या पकरणात मांडता येतील. ‘भगवान अंजनीकर यांच्या साहित्याच्या विवेचक अभ्यास’ या विषयाच्या अनुषंगाने अंजनीकराच्या कथा, कादंबरी, स्फुटलेखन, चरित्र, बालसाहित्य, भाषाशैली, इत्यादी विषयी प्रस्तुत प्रबंधात शोध घ्यावयाचा आहे. भगवान अंजनीकराचे साहित्य म्हणजे विश्वाची व्यथा आहे. ग्रामीण जीवनातील वास्तव दर्शन महापुरुषची चरित्रे लिहुन सुसंस्कारक्षम युवक पिढी बनवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यांची एकुण १०५ पुस्तके वेगवेगळ्या प्रकाशकाने प्रकाशित केले आहेत. प्रबंध लेखनपूर्तीनंतर सविस्तर निष्कर्ष नोंदवण्यात येणार आहेत.

भगवान अंजनीकर यांच्या प्रकाशित साहित्यकृतींची सूची

अ.क्र.	कांदबरी	सन	प्रकाशन
१)	अस्वस्थ किनारा	१९८१	निर्मल प्रकाशन नांदेड
२)	शंकरने गाठले शिखर	१९९९	ज्ञानगंगा प्रकाश पुणे
३)	जगा वेगळा राम	२००९	ज्ञानगंगा प्रकाश पुणे
४)	जंगलातील जत्रा	२००९	ज्ञानगंगा प्रकाश पुणे
५)	जंगलाचा राजा	२०१०	भरती प्रकाश पुणे
६)	काटेरी कुंपण	२००१	रसिक पब्लिकेशन नांदेड
७)	ध्यानीमनी नसताना	२००१	रसिक पब्लिकेशन नांदेड
८)	क्लब	२००१	रसिक पब्लिकेशन नांदेड
९)	भूक आणि पर्याय	२००१	रसिक पब्लिकेशन नांदेड
१०)	विसराळू राजा	२००३	सुरभी प्रकाशन औरंगाबाद
११)	दर्शन कादंबरी	२०११	महाजन ब्रदर्स पुणे
१२)	एकटी	२००६	रसिक प्रब्लिकेशन
१३)	सारे सुखाचे सोबती	२००६	इसाप प्रकाशन नादेड.
१४)	आता नको पुन्हा कधी	२०१२	नर्मल प्रकाशन नांदेड
१५)	काळोख विळखा	२०१२	नर्मल प्रकाशन नांदेड
१६)	परिवर्तनाची लढाई	२०१४	नर्मल प्रकाशन नांदेड
१७)	अंधारवाडा	२०१४	संगत प्रकाशन नांदेड

कथा :

१)	आदर्श गाव	१९८९	निर्मल प्रकाशन
२)	मनी मांजर	१९९६	सांकेत प्रकाशन औरंगाबाद
३)	मदतीचा हात	२००९	ज्ञानगंगा प्रकाशन
४)	कमाई	२००६	लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद
५)	शंकरची धडपड	२००६	लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद
६)	विहीर	२००६	लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद

संपादन

१)	राष्ट्रभक्त सावरकर	२००९	रजत प्रकाशन औरंगाबाद
२)	कृपावंत	२०१२	निर्मल प्रकाशन नांदेड
३)	अभिवादन	२०१२	निर्मल प्रकाशन नांदेड
४)	विद्या उपासक	१९९५	निर्मल प्रकाशन नांदेड
५)	डॉ.आंबेडकरांचे विचारधन	२०००	निर्मल प्रकाशन नांदेड

लेख व ललित

१)	जशी फुले तशी मुले	१९९९	शब्दशिल्प प्रकाशन नांदेड
२)	सदगुणाचा सुगंध	२००९	शब्दशिल्प प्रकाशन नांदेड
३)	तुमचे भवितव्य तुमच्या हाती	२०१४	निर्मल प्रकाशन नांदेड
४)	संशोधकाची भ्रमती	२०१४	निर्मल प्रकाशन नांदेड
५)	वाळवंआतील हिरवळ	२०१४	निर्मल प्रकाशन नांदेड

नाटक

१)	बाहुली	१९९५	शब्दशिल्प प्रकाशन नांदेड
२)	परिक्षा	२०११	निर्मल प्रकाशन नांदेड

काव्यसंग्रह

१)	साक्षरा	१९८४	निर्मल प्रकाशन नांदेड
२)	सारांश	२००५	निर्मल प्रकाशन नांदेड
३)	संदर्भ तुझे नी माझे	२००८	निर्मल प्रकाशन नांदेड
४)	बाहुलीचा वाढदिवस	२००८	निर्मल प्रकाशन नांदेड

चरित्र व चरित्र लेख

१)	कवितेचे दिपस्तंभ	१९८९	इंडिया बुक कंपनी, पुणे
२)	आपले दिपस्तंभ	२००९	इसान प्रकाशन नांदेड
३)	सर्वाचे गुरुजी नरहर कुरुंदरक	२००९	निर्मल प्रकाशन नांदेड
४)	महात्मा बसवेश्वर	२००१	निर्मल प्रकाशन नांदेड

५)	लोकमान्य टिळक	२००९	निर्मल प्रकाशन नीदेड
६)	डॉ. राधाकृष्णन	२००९	निर्मल प्रकाशन नांदेड
७)	राजीव गांधी	२००२	निर्मल प्रकाशन नांदेड
८)	हु. जयवंतराव पाटील	२००६	निर्मल प्रकाशन नांदेड
९)	साने गुरुजी	२००६	निर्मल प्रकाशन नांदेड
१०)	डॉ.बाबासाहेब आंबेडकर	२००६	रजत प्रकाशन औरंगाबाद
११)	राजर्षी शाहु महाराज	२०११	रजत प्रकाशन, औरंगाबाद
१२)	विनोबा भावे	२०११	महजन ब्रदर्स, पुणे
१३)	अहिल्याबाई होळकर	२००८	निर्मल प्रकाशन नांदेड
१४)	प्रतिभा पाटील	२००८	निर्मल प्रकाशन नांदेड
१५)	शांतिदूत नेहरु	२००८	विजयराज प्रकाशन,पुणे
१६)	संत तुकाराम	२००८	लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद
१७)	संत सावतामाळी	२००८	लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद
१८)	वि.दा.सावरकर	२००८	विजयराज प्रकाशन पुणे
१९)	महात्मा फुले चरित्र	२००८	रजत प्रकाशन, औरंगाबाद
२०)	सावित्रीबाई फुले	२००८	रजत प्रकाशन, औरंगाबाद
२१)	महापुरुषांचे चरित्र्यचिंतन	२००८	निर्मल प्रकाशन, नांदेड
२२)	महापुरुषांचे स्मरणचिंतन	२००८	निर्मल प्रकाशन,नांदेड
२३)	असे होते महापुरुष	२००८	निर्मल प्रकाशन,नांदेड
२४)	चरित्रस्मरण	२००९	शब्दशिल्प प्रकाशन,नांदेड
२५)	संत नामदेव	२०१०	अक्षर प्रकाशन, औरगांबाद
२६)	छत्रपती शिवाजी महाराज	२०१०	निर्मल प्रकाशन, नांदेड
२७)	गुरु गोविंदसिंघ	२०१०	निर्मल प्रकाशन,नांदेड
२८)	इंदिरा गांधी	२०१०	शब्दशिल्प प्रकाशन, नांदेड
२९)	राजेद्र प्रसाद	२०१३	शब्दशिल्प प्रकाशन, नांदेड
३०)	सरदार वल्लभाई पटेल	२०१३	शिब्दशिल्प प्रकाशन, नांदेड
३१)	यशवंतराव चव्हाण	२०१३	निर्मल प्रकाशन,नांदेड
३२)	संस्कारपीठाचे मूलगुरू	२०१३	निर्मल प्रकाशन नांदेड

३३)	निवडक महापुरुष	२०१४	निर्मल प्रकाशन नांदेड
३४)	पंतप्रधान नरेद्र मोदी	२०१४	निर्मल प्रकाशन नांदेड
३५)	महान कर्मयोगी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम	२०१४	निर्मल प्रकाशन नांदेड

एकांकीका :

१)	भूक आणि पर्याय	२००१	रसिक पब्लिकेशन,नांदेड
२)	एकदाची शाळा सुटली	२००१	रसिक पब्लिकेशन,नांदेड
३)	मध्यंतर	२००१	अक्षय प्रकाशन, पुणे
४)	घंटा वाजली	२००१	अक्षय प्रकाशन, पुणे
५)	भारतमाता	२००१	अक्षय प्रकाशन, पुणे
६)	माणसांचा शोध	२००१	अक्षय प्रकाशन, पुणे
७)	चेहरा	२००१	अक्षय प्रकाशन, पुणे
८)	स्वप्नभास	२००१	अक्षय प्रकाशन, पुणे
९)	अस्तित्व	२००१	अक्षय प्रकाशन, पुणे
१०)	वादळवारा	२००१	अक्षय प्रकाशन, पुणे
११)	प्रतीक	२००१	अक्षय प्रकाशन, पुणे
१२)	माणसांचा शोध	२००१	अक्षय प्रकाशन, पुणे

लोकनाटय :

१)	तेवढं सोडून बोला	१९९८	निर्मल प्रकाशन नांदेड
२)	सगळेच तसे नसतात	२०११	निर्मल प्रकाशन नांदेड
३)	आता नको पुन्हा कधी	२०१४	निर्मल प्रकाशन नांदेड

संदर्भ ग्रंथ :

१)	आठवणीतले माणसे	-	देवदत्त राजे. - निर्मल प्रकाशन
२)	शब्दगंध	-	(सपा) निर्मलकुमार सुर्यवंशी
३)	मराठी साहित्याचा सांस्कृतिक संदर्भ	-	रा.ग.जाधव
४)	साहित्य आणि समाज	-	गो.म.पवार
५)	साहित्यातील जाणिवा स्वरुप आणि विश्लेषण	-	किर्तीकुमार मोर
६)	माणूस	-	मनोहर तल्हार
७)	महाराष्ट्रातील पाच संप्रदाय	-	प.रा.मोकाशी
८)	कादंबरी समीक्षा	-	श्री मा.कुलकर्णी
९)	भाषा आणि जीवन	-	संपा. कल्याण काळे
१०)	ग्रामीण साहित्य एक चिंतन	-	द.ता. भोसले
११)	ग्रामीण कवितेच्या इतिहास	-	कैलास नार्वेकर
१२)	मराठी वाड्.मयाचा इतिहास	-	वसंत बिरादार
१३)	संक्षिप्त मराठी वाड्.मय कोश	-	वसंत अंबाजी डहाके

संशोधक

नामपल्ले शिवाजी हुल्लाजी

शिवबानगर देगलूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. सौ. मथु सांवत

पदव्युत्तर संशोधन केंद्र, मराठी विभाग

पीपल्स कॉलेज, नांदेड

डॉ. मथु सावंत
संशोधन मार्गदर्शक
पदवी व पदव्युत्तर संशोधन केंद्र
मराठी विभाग, पीपल्स कॉलेज,
नांदेड

दिनांक : 20.04.16

ठिकाण : नांदेड